महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१
e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र कमांक/नाविमं/पमा/ 3570
नागपूर, दिनांक :– 03/12/2024

प्रति,
मुख्याध्यापक,
भंडारा/चंद्रपूर/नागपूर/नागपूर ग्रामिण/
वर्धा/गडचिरोली/ गोंदिया

विषयः–माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) परीक्षा फेब्रुवारी–मार्च 2025 विदयार्थ्यांची अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविषेश अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखांबाबत.......

संदर्भः–1)शासनाचे पत्र क.एसएससी-2002 (66/02)/उमाशी-2,दिनांक 23 एप्रिल 2003,
2)शासनाचे पत्र क.एसएससी-2011 (185/11)/उमाशी-2,दिनांक 11फेब्रुवारी 2013,
3)राज्य मंडळाचे पत्र क.रा.मं./परीक्षा-8/4554, दिनांक 25 नोव्हेंबर 2024,
4)राज्य मंडळाचे पत्र क.रा.मं./परीक्षा-8/4607, दिनांक 28 नोव्हेंबर 2024,

उपरोक्त विषयांस अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, मंडळ विनिमय 1977, नियम कमांक 93 अन्वय फेब्रुवारी–मार्च 2025 मध्ये होणा-या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) परीक्षेस प्रविष्ठ होणा-या विदयार्थ्यांची नियमित व विलंब शुल्कासह परीक्षेची आवेदनपत्र ऑनलाईन स्विकारण्याची मुदत दिनांक 30/11/2024 रोजी संपुष्टात आलेली आहे.

आवेदनपत्र सादर करण्याची निर्धारित मुदत संपल्यानंतर (1) श्रेणी/तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा सुरू होण्यापूर्वी 30 दिवसाचा कालावधी वगळून त्याअगोदर प्रतिदिन रू.50/- याप्रमाणे अतिविलंब शुल्क, (2)अतिविलंब शुल्काच्या निर्धारित तारखेंनंतर लेखी किंवा प्रात्यक्षिक परीक्षेच्या अगोदर जी परीक्षा सुरू होणार आहे त्यातील सुरूवातीच्या 15 दिवसापर्यंत प्रति विदयार्थी प्रती दिन रू. 100/- विशेष अतिविलंब शुल्क व तद्नंतरच्या 15 दिवसांकरीता व परीक्षेच्या आदल्या दिवसापर्यंत म्हणजेच दि. 20/02/2025 पर्यंत रू 200/- प्रमाणे अतिविशेष अतिविलंब शुल्क आकारून आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत.

लेखी परीक्षा दि. 21/02/2025 रोजी सुरू झाल्यानंतर कोणत्याही नियमित, पुनर्परीक्षार्थी, श्रेणी सुधार, खाजगी विद्यार्थी, तुरळक व आय.टी. आय. विषय घेणा–या विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे स्विकारली जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

| परीक्षा | अतिविलंब शुल्क अंतिम मुदत रू. 50/- प्रतिदिनी प्रतिविदयार्थी प्रमाणे | विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत रू.100/- प्रतिदिनी प्रतिविदयार्थी प्रमाणे | अतिविशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत रू.200/- प्रतिदिनी प्रतिविदयार्थी प्रमाणे |
|---|---|---|---|
| माध्यमिक शालांत प्रमाणपत्र(इ.10 वी) परीक्षा | रविवार दिनांक 01/12/2024 ते शनिवार दिनांक 04/01/2025 | रविवार दिनांक 05/01/2025 ते रविवार दिनांक 19/01/2025 | सोमवार दिनांक 20/01/2025 ते गुरूवार दिनांक 20/02/2025 |

तसेच आवेदनपत्रा मध्ये नाव/जन्मतारीख/विषय/माध्यम या बाबत प्रिलिस्ट च्या दुरूस्त्या करावयाच्या राहिलेल्या असल्यास ऑनलाईन नध्दतीने 10 डिसेंबर 2024 पर्यंत पूर्ण करण्यात यावी.

सदर आवेदनपत्र माध्यमिक शाळेने **www-mahahsscboard-in** ऑनलाईन पध्दतीने या संकेतस्थळावर भरावयाचे आहेत. त्यानंतर विदयार्थी व मुख्याध्यापक यांच्या स्वाक्षरीसह आवेदनपत्राची **printout** व आवेदनपत्र जमा करण्याच्या दिवसापर्यंतचे अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्क प्राप्त झाल्यानंतरच ऑनलाइन आवेदनपत्र ग्राहय धरण्यात येईल. कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

सोबतः–
1) शुल्क आकारावयाचा तक्ता, (2) परीशिष्ठ "अ", (3) परीशिष्ठ "ब"

प्रत माहिती तथा योग्य कार्यवाहीस्तव :–
1) मा.सचिव महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे–4 यांना माहितीस्वत समादराने अग्रेषित.
2) शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग नागपूर यांना समादराने अग्रेषित.
3) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया यांना कळविण्यात येते की, आपल्या कार्यकक्षेतील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा यांच्या लेखी निदर्शनास आणून दयावे.

## परिशिष्ट-अ

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४.

परीक्षेचे नावः ---------------------------

विभागीय मंडळाचे नावः ----------- विभागीय मंडळ

प्रकरणिका क्रमांकः -----------------------

विद्यार्थ्यांची मुदतबाहय आवेदनपत्रे स्विकारण्याबाबत शिफारस

**इ.१० वी**

१) विद्यार्थ्यांचे नाव : ---------------------------------------------

२) शाळेचे नाव व पत्ता : ---------------------------------------------

३) शाळेचा सांकेतांक क्रमांक : ------------------------------------------

४) विद्यार्थ्यांना आवेदनपत्रे सादर करता आली नाहीत त्याबाबत खालील कारणासमोर (✓) अशी खूण करावी.

अ ( ) विद्यार्थ्याचा प्रलंबित आजार        ब ( ) विद्यार्थ्याच्या पालकाचे आकस्मिक निधन

क ( ) नैसर्गिक आपत्ती        ड ( ) या खेरीज अन्य रास्त व योग्य कारण असल्यास

इ ( ) अनपेक्षित कारणामुळे विद्यार्थ्यास बऱ्याच कालावधीसाठी परगावी/परदेशी जाणे भाग पडल्यास

५) उपरोक्त कारणाचे अनुषंगाने सादर केलेला पुरावा.

१. ------------------------ २. --------------------------

३. ------------------------ ४. --------------------------

५. ----------------------------------------------------

६) शाळा प्रमुखांची शिफारस :-

--------------------------------------------------------

--------------------------------------------------------

मुख्याध्यापक स्वाक्षरी व शिक्का

७) अ) अतिविलंबाचे एकूण दिवस : -------- ब) अतिविलंबाच्या दंडाची रक्कम ----------

क) दंड कशाप्रकारे भरला - रोख/ चलन क्रमांक ------------------

ड) विभागीय अध्यक्षांची शिफारस ------------------------------------

------------------------------------

मी या प्रकरणी सादर करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची छाननी केली असून, उमेदवाराने आवेदनपत्र उशीरा सादर करण्यासाठी दिलेले कारण योग्य आहे. केवळ अपवादात्मक प्रकरण म्हणूनच मंडळ विनियम क्रमांक ४६ मधील तरतुदीनुसार उमेदवारांचा अर्ज स्वीकारावा अशी माझी शिफारस आहे. सदर विद्यार्थ्यांचे आवश्यक ते अतिविलंब शुल्क कार्यालयात जमा केले आहे.

विभागीय अध्यक्षांची स्वाक्षरी,
विभागीय मंडळाचे नाव व शिक्का